७

# विदर्भातील माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टीचा तुलनात्मक अभ्यास

**नंदा मधुकर देशमुख**
संशोधनकर्ती,
पदव्युत्तर शिक्षण विभाग,
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

**डॉ. रेणू बायस्कर (सदार)**
सहाय्यक प्राध्यापक,
पदव्युत्तर शिक्षण विभाग,
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

## सारांश

मानवाचा सर्वांगीण विकास करण्याची क्षमता ही शिक्षणात असते व या सर्वाचा अर्थ लक्षात घेवून कृतीत कार्य दृश्य स्वरूपात दाखविणारा अभिव्यक्ती म्हणजे शिक्षक होय. कोणत्याही व्यवसायामधील यश हे त्यामध्ये असलेल्या रूचीवर अवलंबून असते. त्याचप्रमाणे व्यवसाय संतुष्टीवर सुध्दा यश अवलंबून असते व व्यक्तीला व्यवसायात यश तेव्हाच मिळते जेव्हा तो पूर्ण एकाग्रता, मेहनत आणि प्रामाणिकपणे ते व्यवसाय करतो आणि या तीनही घटकांचा उपयोग व्यक्ती तेव्हाच करतो जेव्हा तो आपल्या व्यवसायात संतुष्ट असतो. यामुळेच शिक्षकांची व्यवसाय संतुष्टी अभ्यासणे महत्वाचे ठरते. प्रस्तुत संशोधनकार्यात मुख्यत: सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला व तथ्य संकलन करण्यासाठी संशोधिकेने डॉ. मीरा दीक्षीत यांनी केली प्रमाणिकृत प्रश्नावलीचा वापर केला आहे. प्रस्तुत संशोधनात विदर्भातील सर्व जिल्ह्यातील यादृच्छिक पद्धतीने न्यादर्श म्हणून ११०० शिक्षक न्यादर्श म्हणुन निवडण्यात आले. प्राप्त परिणामांच्या आधारे असे निदर्शनास येते की, स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांची व्यवसाय संतुष्टि सीबीएसई बोर्ड शाळेतील शिक्षकांपेक्षा अधिक आहे.

## प्रस्तावना

जगामध्ये होत असलेल्या परिवर्तनाचा वेग विविध कारणामुळे वाढलेला आहे. त्यामुळे आजचे शिक्षण ही उदयाची तयारी ही कल्पना कुचकामी ठरलेली आहे. शिक्षणासंबंधी बऱ्याचशा कल्पना प्रचलीत आहेत. शिक्षणाने मानव हा सुसंस्कृत होतो, शिक्षणाने ज्ञानाची प्राप्ती होते. असे म्हटल्या जाते. निव्वळ शाळेत जाणे म्हणजे ज्ञानप्राप्ती होते असे नाही किंवा निव्वळ ज्ञानग्रहण करणे म्हणजे शिक्षण घेणे असेही म्हणता येत नाही. तर मानव हा अवतीभोवती घडणाऱ्या घटना, व्यवहारातुन आणि अनेक अनुभवातून शिकतच असतो. प्रत्येक सुसंस्कारित समाज हा शिक्षणानेच घडत असतो. शिक्षणाच्या विविध व्याख्यांच्या आधार घेऊन आपल्याला असे म्हणता येईल की, मानवाचा सर्वांगीण विकास करण्याची क्षमता ही शिक्षणात असते (कुंडले, १९९०). या सर्वाचा अर्थ लक्षात घेवून कृतीत कार्य दृश्य स्वरूपात दाखविणारा अभिव्यक्ती म्हणजे शिक्षक होय. याच शिक्षकांची व्यवसाय संतुष्टी, अध्यापन अभिवृत्ती व अध्यापन परिणामकारकता अभ्यासणे महत्वाचे ठरते.

**माध्यमिक स्तरावरील शिक्षण व्यवस्था**

भारतीय शिक्षण व्यवस्थेत सुधारणावादी धोरण राबवितांना विविध शिक्षण आयोगाद्वारे भारतीय शिक्षण व्यवस्थेचे स्वरूप कशा प्रकारे राहिल याबाबत अनेक दिशादर्शक उपाययोजना सूचविल्यात. त्यानुसार भारतीय राजकीय व्यवस्थेने राष्ट्रीय पातळी, राज्य पातळी आणि स्थानिक पातळीवर अनेक प्रकारे शिक्षण व्यवस्था तयार होतील व त्याद्वारे विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याकरिता विविध शैक्षणिक मंडळ तयार केलेले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून राज्य बोर्ड आणि केंद्र (सीबीएसई बोर्ड) बोर्ड अशा प्रकारच्या मंडळाद्वारे शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली.

राज्य बोर्ड हे राज्य पातळीवरील संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचे कार्य पाहते. त्यात शिक्षक–विद्यार्थी–सामाजिक गरजा या तिन्हीचा मेळ घालण्याचा प्रयत्न करीत असते. शाळा व्यवस्थापन, शिक्षक अध्यापन व विद्यार्थ्यांचे अध्ययन याबाबीकरिता अभ्यासक्रम तयार करणे, शिक्षकांना प्रशिक्षण देणे, शैक्षणिक प्रगतीस योग्य वातावरण तयार करणे इत्यादी कार्य करित असते. सीबीएसई बोर्ड सुध्दा याप्रकारचे कार्य करित असते. परंतु राज्य बोर्ड अणि सीबीएसई बोर्ड यामध्ये प्रामुख्याने शिक्षणाचे माध्यम, शैक्षणिक व्यवस्थापन यामध्ये मोठया प्रमाणात फरक दिसून येतो. त्याची प्रचीती विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणूकीतून दिसून येते. तसेच शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टी व अध्यापन परिणामकारकता या सर्वांवर राज्य व सीबीएसई बोर्डाच्या स्वरूपातून फरक आहे.

कोणत्याही व्यवसायामधील यश हे त्यामध्ये असलेल्या रूचीवर अवलंबून असते. त्याचप्रमाणे व्यवसाय संतुष्टीवर सुध्दा यश अवलंबून असतो (Basu, 2016). व्यक्तीला व्यवसायात यश तेव्हाच मिळते जेव्हा तो पूर्ण एकाग्रता, मेहनत आणि प्रामाणिकपणे ते व्यवसाय करतो आणि या तीनही घटकांचा उपयोग व्यक्ती तेव्हाच करतो जेव्हा तो आपल्या व्यवसायात संतुष्ट असतो (Dubey and Kumar, 2016). जेव्हा त्याला आपल्या व्यवसायात संतुष्टी प्राप्त होते तेव्हा तो आपले कार्य फक्त कर्तव्य म्हणून करीत नाही तर संपुर्ण आहे तो आपले अध्यापन कार्य परिणामकारक करण्यासाठी तो प्रयत्नशील असतो व अशा प्रकारच्या अध्यापन पध्दतीची निवड करतो की ज्याद्वारे शिक्षणाच्या परम उद्दिष्टाला प्राप्त करता येईल (Chamundeshwari, 2013).

व्यवसाय संतुष्टी ही एक व्यक्तिगत स्वरूपाची बाब असल्याने त्यातील विविध घटक हे व्यक्तिपरत्वे भिन्न भिन्न स्वरूप धारण करू शकतात. व्यवसाय संतुष्टीमध्ये असणारे विविध घटकाबाबत असे म्हणता येईल की, गरजेभिमूख वेतन, प्रोत्साहन, कर्मचारी प्रशिक्षण, कर्मचारी कल्याण, स्व:स्वीकार, इत्यादी. यावरून असे म्हणता येईल की, व्यवसाय संतुष्टी हा व्यवसायातील सकारात्मक दृष्टिकोण निर्माण करणारा महत्वाचा घटक आहे (Dhool and Jain, 2017). ज्या प्रमाणे एखाद्या कामगाराकरिता वरिल विविध घटक आपल्या व्यवसायात संतुष्ट करीत असतात, त्याप्रमाणेच शिक्षकांच्या सुध्दा या विविध घटकांच्या संदर्भात त्यांच्या व्यवसाय संतुष्टीचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**संशोधन पध्दती**

संशोधन कार्यासाठी निर्दोष माहिती मिळण्यासाठी व संशोधनाची उद्देशपुर्ती होण्यासाठी प्रस्तुत संशोधनात मुख्यत: सर्वेक्षण व निरीक्षण या पद्धतींचा अवलंब करण्यात आला. प्रस्तुत अभ्यासात विदर्भातील माध्यमिक स्तरातील शाळांमधील शिक्षकांची व्यवसाय संतुष्टी व अध्यापन परिणामकारकता सर्वेक्षणाच्या माध्यमातून जाणुन घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**२.१ संशोधनाची उद्दिष्टे**

१. विदर्भातील माध्यमिक स्तरावरील सीबीएसई बोर्ड मध्ये अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिचा अभ्यास करणे.

२. विदर्भातील माध्यमिक स्तरावरील स्टेट बोर्ड मध्ये अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिचा अभ्यास करणे.

३. विदर्भातील माध्यमिक स्तरावरील सीबीएसई व स्टेट बोर्ड मध्ये अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिची तुलना करणे.

**२.२ संशोधनाची परिकल्पना**

– विदर्भातील माध्यमिक स्तरावरील सीबीएसई व स्टेट बोर्ड मध्ये अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिमध्ये सार्थक फरक आहे.

**२.३ सर्वेक्षण साधनाची निवड – व्यावसायीक संतुष्टी शोधिका**

प्रस्तुत समस्येचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने प्रमाणिकृत प्रश्नावली या संशोधन साधनाची निवड केलेली आहे (घाटोळे, १९९०). शिक्षकांच्या व्यावसायिक संतुष्टी स्तराचे परीक्षण करण्याकरिता लिकर्ट चाचणी सारख्या चाचणीची निर्मिती करण्यात आली. या चाचणीची निर्मिती नॅशनल डिग्री कॉलेज नवी दिल्ली येथील डॉ. मीरा दीक्षीत यांनी केली आहे. या चाचणीत ५८ प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे. या मापनीद्वारे माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या कार्य समाधानाला प्रभावित करणारे घटक यांचा अध्ययन करण्यात आले, हे घटक आहेत, जसे, व्यावसायातील महत्वाचे पैलू, वेतन, सोयी सुविधा व पदोन्नती, संस्थात्मक योजना व धोरण, उच्च अधिकाऱ्यांशी समाधान, सामाजिक स्थिती व कौटूंबिक कल्याण, विद्यार्थ्यांशी असलेली जवळीक व सहकाऱ्यांशी असलेले संबंध.

**२.४ अभ्यासक्षेत्र व संशोधन आराखडा :**

प्रस्तुत अध्ययनाचे कार्यक्षेत्र हे महाराष्ट्राच्या विदर्भ क्षेत्रातील सर्व जिल्ह्यातील माध्यमिक स्तरातील सर्व शाळांपूरते मर्यादित होते. प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक व विश्लेषणात्मक अशा मिश्र संशोधन आराखडयाची निवड करण्यात आली आहे.



Vol: 7th , Issue : I , English-Marathi, Quarterly: 1st June 2018,ISSN : 2319-5525
UGC Approval No. 63299

### २.५ जनसंख्या, न्यादर्श, न्यादर्श पद्धती व तथ्य संकलन :

प्रस्तुत संशोधनात विदर्भातील सर्व जिल्ह्यातील माध्यमिक स्तरातील शाळांमधील संपूर्ण शिक्षकांचा समावेश करण्यात आला म्हणून माध्यमिक स्तरातील संपूर्ण शिक्षक प्रस्तुत संशोधनातील जनसंख्या होय. प्रस्तुत संशोधनात विदर्भातील अकरा जिल्ह्यातील तालुकानिहाय माध्यमिक शाळांमधील १०० शिक्षक याप्रमाणे एकूण ११०० शिक्षकांना यादृच्छिक पद्धतीने न्यादर्श म्हणून निवडण्यात आले. संशोधन विषयानुसार विदर्भाच्या माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टीचा त्यांच्या अध्यापन परिणामकारकतेवर याबाबत सर्वेक्षणामार्फत प्रश्नावलीद्वारे माहिती संकलीत करण्यात आली.

### २.६ सांख्यकीय विश्लेषण

सांख्यकीय तंत्रातील विविध ग्राहयता चाचणीचा विशेषत्वाने उपयोग करण्यात आला व त्या आधारावर निष्कर्ष काढले गेलेत. प्राप्त माहितीवरुन मध्यमान व मानक विचलन काढण्यात आले. अभ्यासातील विविध घटक, पडताळण्याकरीता देण्यात आलेले गृहित प्रमेय आणि वापरण्यात आलेला संशोधनाचा आराखडा लक्षात घेता तुलनात्मक अभ्यासासाठी 't' test या सांख्यिकीय चाचणीचा वापर करण्यात आला. Confidence Interval 0.05 ठेवण्यात आली.

### ३.० माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रस्तुत संशोधनात प्राप्त झालेल्या गुणांकाचे मध्यमान, टी – मुल्य, काढण्यात आले. यावरून विदर्भातील माध्यमिक स्तरावरील राज्य व केंन्द्र बोर्ड मधील शाळेत अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टीचा अभ्यास करण्यात आला. विदर्भातील माध्यमिक स्तरावरील सीबीएसई व स्टेट बोर्ड मधील शाळेत अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिचा अभ्यास करतांना व्यवसाय संतुष्टिला प्रभावीत करणाऱ्या खालील घटकांचा अभ्यास करण्यात आला, तो पुढील प्रमाणे नोकरी/व्यवसायातील अंतर्गत घटक, वेतन, पदोन्नती मार्ग व सेवा परिस्थिती, शाळेतील भौतिक सुविधा, संस्थात्मक योजना व धोरणे, शाळेतील अधिकाऱ्यांप्रती समाधान, सामाजिक दर्जा व कुटुंब कल्याण संबंधित समाधान, विद्यार्थ्यांशी सलोख्याचे संबंध व शाळेतील सहकाऱ्यांसोबत संबंध

### ३.१ नोकरीतील अंतर्गत घटक

**सारणी क्र. १ :** सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टीच्या नोकरीतील अंतर्गत घटक याची तुलना



Vol: 7th, Issue : I , English-Marathi, Quarterly: 1st June 2018,ISSN : 2319-5525
UGC Approval No. 63299

| शाळा | संख्या | मध्यमान | प्र.वि. | किमान | कमाल | म.फ. | t | P |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सीबीएसई बोर्ड | ५५० | १२.१ | ±५.८ | ७ | २५ | ४.२ | ३.५२८ | <0.05 |
| स्टेट बोर्ड | ५५० | १६.३ | ±६.२ | ७ | २८ | | | |

**प्र.वि.**: प्रमाण विचलन; **म.फ.**: मध्यमानातील फरक; **'t'**: मूल्य; **NS**: Not Significant

प्रस्तुत सारणीत अध्ययन क्षेत्रातील सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिच्या नोकरी/व्यवसायातील अंतर्गत घटक याबाबतीतील तुलना दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार सीबीएसई शाळेतील शिक्षकांचा व्यवसाय संतुष्टिच्या नोकरी/व्यवसायातील अंतर्गत घटकाचा सरासरी गुणांक १२.१±५.८ असून स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांचा सरासरी गुणांक १६.३±६.२ असल्याचे आढळले. वरील माहितीवरून शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिच्या नोकरी/व्यवसायातील अंतर्गत घटकांची तुलना केली असता सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांच्या नोकरीच्या अंतर्गत घटकात महत्वपूर्ण फरक दिसून आला.

### ३.२ वेतन, पदोन्नती मार्ग व सेवा परिस्थिती

**सारणी क्र. २**: सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिच्या वेतन, पदोन्नती मार्ग व सेवा परिस्थिती घटक याची तुलना

| शाळा | संख्या | मध्यमान | प्र.वि. | किमान | कमाल | म.फ. | t | P |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सीबीएसई बोर्ड | ५५० | १४.४ | ±४.८ | ८ | ३३ | ८.१ | ५.२५० | <0.05 |
| स्टेट बोर्ड | ५५० | २२.५ | ±६.१ | १० | ३२ | | | |

**प्र.वि.**: प्रमाण विचलन; **म.फ.**: मध्यमानातील फरक; **'t'**: मूल्य; **NS**: Not Significant

प्रस्तुत सारणीत सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिच्या वेतन, पदोन्नती मार्ग व सेवा परिस्थिती घटक याबाबींची तुलना दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार सीबीएसई शाळेतील शिक्षकांचा व्यवसाय संतुष्टिच्या वेतन, पदोन्नती मार्ग व सेवा परिस्थिती या घटकाचा सरासरी गुणांक १४.४±४.८ असून स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांचा सरासरी गुणांक २२.५±६.१ असल्याचे आढळले. प्राप्त माहितीच्या आधारे असे निदर्शनास येते की सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिच्या वेतन, पदोन्नती मार्ग व सेवा परिस्थितीमध्ये सार्थक फरक आहे.

## ३.३ शाळेतील भौतिक सुविधा

**सारणी क्र. ३:** सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिच्या शाळेतील भौतिक सुविधा घटकाची तुलना

| शाळा | संख्या | मध्यमान | प्र.वि. | किमान | कमाल | म.फ. | t | P |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सीबीएसई बोर्ड | ५५० | २६.३ | ±७.१ | १४ | ३६ | ७.४ | ४.२४८ | <0.05 |
| स्टेट बोर्ड | ५५० | १८.९ | ±८.४ | १० | ३६ | | | |

**प्र.वि.**: प्रमाण विचलन; **म.फ.**: मध्यमानातील फरक; **'t'**: मूल्य; **NS**: Not Significant

प्रस्तुत सारणीत सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिच्या भौतिक सुविधा घटक याबाबीची तुलना दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार सीबीएसई शाळेतील शिक्षकांचा व्यवसाय संतुष्टिच्या भौतिक सुविधा या घटकाचा सरासरी गुणांक २६.३±७.१ असून स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांचा सरासरी गुणांक १८.९±८.४ असल्याचे आढळले. वरील माहितीवरून सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांची व्यवसाय संतुष्टि (भौतिक सुविधा या घटकाच्या) या मध्ये विशेष फरक दिसून आला.

## ३.४ संस्थात्मक योजना व धोरणे

**सारणी क्र. ४:** अध्ययन क्षेत्रातील सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिच्या संस्थात्मक योजना व धोरण या घटकाची तुलना

| शाळा | संख्या | मध्यमान | प्र.वि. | किमान | कमाल | म.फ. | t | P |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सीबीएसई बोर्ड | ५५० | २१.० | ±६.२ | ११ | २३ | ८.५ | ५.३८० | <0.05 |
| स्टेट बोर्ड | ५५० | १३.५ | ±६.० | ९ | २४ | | | |

**प्र.वि.**: प्रमाण विचलन; **म.फ.**: मध्यमानातील फरक; **'t'**: मूल्य; **NS**: Not Significant

प्रस्तुत सारणीत संस्थात्मक योजना व धोरणांसंबंधी अध्ययन क्षेत्रातील सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांची तुलना दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार सीबीएसई शाळेतील शिक्षकांचा संस्थात्मक योजना व धोरणे या घटकासंबंधीचा सरासरी गुणांक २१±६.२ असून स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांचा संस्थात्मक योजना व धोरणे यासंबंधी घटकांचा सरासरी गुणांक १३.५±६.० असल्याचे आढळले. वरील माहितीवरून सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांची संस्थात्मक योजना व धोरणे या घटकासंबंधी शिक्षकांची तुलना केली असता सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टित विशेष फरक दिसून आला.



Vol: 7th , Issue : I , English-Marathi, Quarterly: 1st June 2018,ISSN : 2319-5525
UGC Approval No. 63299

### ३.५ शाळेतील अधिकाऱ्यांप्रती समाधान

**सारणी क्र. ५:** सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिच्या अधिकाऱ्यांप्रती समाधान या घटकाची तुलना

| शाळा | संख्या | मध्यमान | प्र.वि. | किमान | कमाल | म.फ. | t | P |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सीबीएसई बोर्ड | ५५० | १२.९ | ±५.१ | ९ | २२ | ४.६ | २.०६४ | <0.05 |
| स्टेट बोर्ड | ५५० | १७.५ | ±५.६ | १० | २४ | | | |

**प्र.वि.**: प्रमाण विचलन; **म.फ.**: मध्यमानातील फरक; **'t'**: मूल्य; **NS**: Not Significant

प्रस्तुत सारणीत सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांची व्यवसाय संतुष्टिच्या अधिकाऱ्यांप्रती समाधान या घटकांसंबंधी तुलना दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार सीबीएसई शाळेतील शिक्षकांचा अधिकाऱ्यांप्रती समाधान या घटकांचा सरासरी गुणांक १२.९±५.१ असून स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांचा सरासरी गुणांक १७.५±५.६ असल्याचे आढळले. वरील माहितीवरून असे निदर्शनास येते की व्यवसाय संतुष्टिच्या अधिकाऱ्यांप्रती समाधान या घटकाची तुलना केली असता सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांच्या या घटकाप्रति असलेल्या अभिवृत्तीत सार्थक फरक आहे.

### ३.६ सामाजिक दर्जा व कुटुंब कल्याण संबंधित समाधान

**सारणी क्र. ६:** सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिच्या सामाजिक दर्जा व कुटुंब कल्याण संबंधित समाधान या घटकाची तुलना

| शाळा | संख्या | मध्यमान | प्र.वि. | किमान | कमाल | म.फ. | t | P |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सीबीएसई बोर्ड | ५५० | १०.८ | ±४.५ | ७ | २० | ३.४ | २.०८४ | <0.05 |
| स्टेट बोर्ड | ५५० | १४.२ | ±४.० | ९ | २० | | | |

**प्र.वि.**: प्रमाण विचलन; **म.फ.**: मध्यमानातील फरक; **'t'**: मूल्य; **NS**: Not Significant

प्रस्तुत सारणीत सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांची व्यवसाय संतुष्टिच्या सामाजिक दर्जा व कुटुंब कल्याण संबंधित समाधान या घटकांसंबंधी तुलना दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार सीबीएसई शाळेतील शिक्षकांचा सामाजिक दर्जा व कुटुंब कल्याण संबंधित समाधान या घटकांचा सरासरी गुणांक १०.८±४.५ असून स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांचा सरासरी गुणांक १४.२±४.० असल्याचे आढळले. वरील माहितीवरून असे निदर्शनास येते की व्यवसाय संतुष्टिच्या सामाजिक दर्जा व कुटुंब कल्याण संबंधित समाधान या घटकामध्ये सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांमध्ये विशेष फरक आहे.

## ३.७ विद्यार्थ्यांशी सलोख्याचे संबंध

**सारणी क्र. ७ :** अध्ययन क्षेत्रातील सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिच्या विद्यार्थ्यांशी सलोख्याचे संबंध या घटकाची तुलना

| शाळा | संख्या | मध्यमान | प्र.वि. | किमान | कमाल | म.फ. | t | P |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सीबीएसई बोर्ड | ५५० | १५.५ | ±४.९ | ९ | २४ | ४.२ | २.६९३ | <0.05 |
| स्टेट बोर्ड | ५५० | ११.३ | ±५.७ | ८ | २१ | | | |

**प्र.वि.**: प्रमाण विचलन; **म.फ.**: मध्यमानातील फरक; **'t'**: मूल्य; **NS**: Not Significant

प्रस्तुत सारणीत सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिच्या विद्यार्थ्यांशी सलोख्याचे संबंध या घटकाची तुलना दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार सीबीएसई शाळेतील शिक्षकांचा विद्यार्थ्यांशी सलोख्याचे संबंध या घटकांचा सरासरी गुणांक १५.५±४.९ असून स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांचा सरासरी गुणांक ११.३±५.७ असल्याचे आढळले. वरील माहितीवरून व्यवसाय संतुष्टिच्या विद्यार्थ्यांशी सलोख्याचे संबंध या घटकाची तुलना केली असता सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांच्या अभिवृत्तीत विशेष फरक आहे असे निदर्शनास येते.

## ३.८ शाळेतील सहकाऱ्यांसोबत संबंध

**सारणी क्र. ४.१.८ :** अध्ययन क्षेत्रातील सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिच्या शाळेतील सहकाऱ्यांसोबत संबंध या घटकाची तुलना

| शाळा | संख्या | मध्यमान | प्र.वि. | किमान | कमाल | म.फ. | t | P |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सीबीएसई बोर्ड | ५५० | १०.६ | ±४.६ | ७ | २० | ४.१ | २.४३१ | <0.05 |
| स्टेट बोर्ड | ५५० | १४.७ | ±४.३ | ९ | २० | | | |

**प्र.वि.**: प्रमाण विचलन; **म.फ.**: मध्यमानातील फरक; **'t'**: मूल्य; **NS**: Not Significant

प्रस्तुत सारणीत सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांची व्यवसाय संतुष्टिच्या शाळेतील सहकाऱ्यांसोबत संबंध या घटकाची तुलना दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार सीबीएसई शाळेतील शिक्षकांचे सहकाऱ्यांसोबत संबंध या घटकांचा सरासरी गुणांक १०.६±४.६ असून स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांचा सरासरी गुणांक १४.७±४.३ असल्याचे आढळले. वरील माहितीवरून व्यवसाय संतुष्टिच्या शाळेतील सहकाऱ्यांसोबत संबंध या घटकाची तुलना केली असता सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांच्या अभिवृत्तीत विशेष फरक आहे असे निदर्शनास येते.

### ३.९ शिक्षकांची एकूण व्यावसायिक संतुष्टी

**सारणी क्र. ४.१.९:** अध्ययन क्षेत्रातील सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांची एकंदरीत व्यवसायिक संतुष्टिची तुलना

| शाळा | संख्या | मध्यमान | प्र.वि. | किमान | कमाल | म.फ. | t | P |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सीबीएसई बोर्ड | ५५० | ११३.१ | ±२४.४ | ५२ | १८४ | २२.१ | ४.०३४ | <0.05 |
| स्टेट बोर्ड | ५५० | १३५.२ | ±२५.९ | ६८ | १९५ | | | |

**प्र.वि.**: प्रमाण विचलन; **म.फ.**: मध्यमानातील फरक; **'t'**: मूल्य; **NS** : Not Significant

प्रस्तुत सारणीत शिक्षकांच्या एकूण व्यावसायिक अभिवृत्ती या घटकांसंबंधी अध्ययन क्षेत्रातील सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांची तुलना दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार सीबीएसई शाळेतील शिक्षकांच्या एकूण व्यवसाय संतुष्टिचा घटकाचा सरासरी गुणांक ११३.५±२४.४ असून स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांच्या सरासरी गुणांक १३५.२±२५.९ असल्याचे आढळले. वरील माहितीवरून शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिची तुलना केली असता सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिमध्ये विशेष फरक असल्याचे निदर्शनास येते.

### ४.० संशोधन परिकल्पना परीक्षण

● विदर्भातील माध्यमिक स्तरावरील सीबीएसई व स्टेट बोर्ड मध्ये अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिमध्ये सार्थक फरक आहे.

● प्राप्त परिणामांच्या सांख्यिकिय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, विदर्भातील माध्यमिक स्तरावरील स्टेट बोर्ड आणि सीबीएसई बोर्ड मध्ये अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टीमध्ये सार्थक फरक आहे, यावरून " विदर्भातील माध्यमिक स्तरावरील सीबीएसई व स्टेट बोर्ड मध्ये अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिमध्ये सार्थक फरक आहे" या परिकल्पनेचा **स्वीकार** करण्यात येतो

### ५.० निष्कर्ष

प्राप्त परिणामांच्या आधारे असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील सीबीएसई व स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय संतुष्टिच्या नोकरी/व्यवसायातील अंतर्गत घटकात महत्वपुर्ण फरक आहे. विशेषत:, स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांची व्यवसाय संतुष्टि नोकरी/ व्यवसायातील अंतर्गत घटक, वेतन, पदोन्नती मार्ग व सेवा परिस्थिती, शाळेतील अधिकाऱ्यांप्रती समाधान, सामाजिक दर्जा व कुटुंब कल्याण संबंधित समाधान व शाळेतील सहकाऱ्यांसोबत संबंध या घटकांच्या अनुशंगाने अधिक असल्याचे आढळले. तर, सीबीएसई बोर्ड शाळेतील


Vol: 7th , Issue : I , English-Marathi, Quarterly: 1st June 2018,ISSN : 2319-5525
UGC Approval No. 63299

शिक्षकांची व्यवसाय संतुष्टि भौतिक सुविधा, शाळेत संस्थात्मक योजना व धोरणे, विद्यार्थ्यांशी सलोख्याचे संबंध या घटकाच्या अनुशंगाने अधिक असल्याची आढळली. एकेदरीत प्राप्त माहितीच्या आधारे असे निदर्शनास येते की, स्टेट बोर्ड शाळेतील शिक्षकांची व्यवसाय संतुष्टि सीबीएसई बोर्ड शाळेतील शिक्षकांपेक्षा अधिक आहे.

**६.० आधारग्रंथ सुची**


१. घाटोळे रा.ना. (१९९०) समाज शास्त्रीय संशोधन तत्वे आणि पध्दती श्री मंगेश प्रकाशन रामदासपेठ नागपूर, चतुर्थ आवृत्ती.

२. बोधनकर सु., अलोनी वि., (२००३) सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

३. कायंदे पाटील गं. वि. (२००६) संशोधन पद्धती चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक.

४. कुलकर्णी बी.डी. व ढमढेरे एस.व्ही. (२००७) : अर्थशास्त्रीय संशोधन पध्दती, डायमंड पब्लिकेशन, पूणे.

५. कुंडले म.बा., 'शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक मानसशास्त्र', श्री विद्या प्रकाशन, राविवार पेठ, पुणे १९९०, पृ. क्र. ६.

६. कऱ्हाडे बी. एम (२००८) 'शास्त्रीय संशोधन पद्धती' पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर-

७. मेश्राम सु- (२०००) प्रात्यक्षिक सामाजिक संशोधन, नागपूर, कृष्णचंद एजन्सीज लक्ष्मीनगर-

८. जरारे वि. (२००४) सामाजिक शास्त्राची संशोधन प्रणाली अद्यवैत प्रकाशन अकोला प्रथम आवृत्ती.

९. Basu, S. (2016) Professional Commitment and Job Satisfaction among Secondary School Teachers, Educational Quest; New Delhi,

१०. Chamundeshwari, M. (2013) Job Satisfaction and Performance of school Teachers, International Journal of Academic Research in Business and Social Sciences 3(5),pp. 420-428.

११. Dhool, K and Jain, M. (2017) A Study of Attitude Towards Teaching Profession In Relation To Job Satisfaction Among Secondary School Teachers, International Education And Research Journal, 3(1). pp 830-833

१२. Dubey, S and Kumar, M.A.(2016) A Study of Job Satisfaction And Job Stress Among Physical Education Teachers Working In Government, Semi-Government And Private Schools, International Journal of Sports Sciences and Fitness, 6(1) pp 89-99.


...